# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१२२८
२५६२१२२९
ई–मेल:
pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/२६८ दिनांक : १७/०८/२०२२

प्रति,
१) मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

२) मा. विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : वार्षिक अहवाल सन २०२१–२२ साठीची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणेसाठी दि. ०२/०९/२०२२ पर्यंत मुदत वाढविल्याबाबत.

संदर्भ : या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/२२३, दिनांक ०१ जुलै, २०२२

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल तयार करण्याचे काम सध्या नियोजन व विकास विभागात सुरु आहे. सदर अहवालासाठी आवश्यक असणारी माहिती विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये दि. १३ ऑगस्ट, २०२२ पर्यंत मागविण्यात आली होती. या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, सदर माहिती ऑनलाईन पध्दतीने भरण्याची मुदत **दि. ०२ सप्टेंबर, २०२२ पर्यंत वाढविण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत सदर मुदतीमध्ये वाढ करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी** कृपया नोंद घ्यावी.

**सदर वार्षिक अहवालाची माहिती फक्त ऑन-लाईन पध्दतीनेच सादर करावी. ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची छापील प्रत (Printout) विद्यापीठास सादर करू नये.**

आपणांस विनंती की, विद्यापीठाच्या वार्षिक अहवाल २०२१–२२ साठीची माहिती विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने सादर करून विद्यापीठास सहकार्य करावे. सदर माहितीची पूर्तता विहित मुदतीत न झाल्यास शासनाकडून व विद्यापीठाकडून विविध योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान, सोयी/सवलती व इतर लाभ प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,
17/08/22
(डॉ. वैशाली साकोरे)
उपकुलसचिव